महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २३८ वे | दिनांक : २४/०८/२०२६ | वार : सोमवार

## मुंबईतील मोकळ्या मैदानांसाठी आदित्य ठाकरेंचे 'तिरंगा आंदोलन'



**मुंबई :** येथील नेव्हिल डिसूझा फुटबॉल मैदानावर आज तिरंगा आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. मुंबईमधील जी मोकळे मैदान होती, ती पुन्हा एकदा मुलांसाठी मोकळी उपलब्ध मिळायला हवीत या मागणीसाठी शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी हे आंदोलन केले. यावेळी बोलताना त्यांनी भाजप तसेच महायुती सरकारवर टीका केली आहे.

सभेत बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, आज आपण इथे सगळे जमले आहोत एकाच कारणामुळे ते म्हणजे मुंबईतले मोकळे मैदान, हे मोकळे मैदान राहिलेच पाहिजेत या साठी. गेल्या ४ वर्षांत ही मुंबई बदलायला लागली आहे. आम्ही हा लढा जेव्हापासून सुरू केला आहे, ४ वर्षांत जवळपास १५ पेक्षा जास्त मैदाने कमर्शियल किंवा रेसिडेन्शियल केली आहेत. जेव्हा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांनी सांगितले होते की मैदान ही मैदानच राहिली पाहिजेत.

पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, आज १७ मैदानांची रूपरेषा बदलून तिथे रेसिडेन्शियल किंवा कमर्शियल प्रॉपर्टी होणार आहे. मुंबईत जी कोणती मैदाने होती ती कमी होत आहेत. झाडे कमी होत आहेत. विकास झाला पाहिजे, त्यात काही शंका नाही, मात्र आपली मैदाने जी आहेत ती राहिली पाहिजेत. आज आपण ज्या मैदानावर उभे आहोत, हा ६ एकरचा प्लॉट आहे. आज ते दावे करत आहेत की हा भूखंड फुटबॉलसाठी दिला. मात्र त्यांनी फक्त इथली मधली जागा दिली आहे. ही लढाई आज सुरू झाली आहे. आपल्या मोकळ्या मैदानांसाठी आपण लढत राहू आणि जोपर्यंत आम्हाला आमची मैदान मिळत नाहीत तोपर्यंत आम्ही महापालिकेच्या चौकात येऊन बसू, असा इशारा आदित्य ठाकरे यांनी दिला आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले, पाली हिलमध्ये देखील मोकळे मैदान होते, मात्र तिथे आता बांधकाम सुरू केले आहे. आम्ही तिथे पण येणार आहोत. आजकाल विंग्जमध्ये खेळायला जावे लागते, आधी इथे मोफत खेळता येत होते. अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स सुद्धा कमर्शियल करण्यात येत आहे. मी पर्यावरणमंत्री असताना अर्बन फॉरेस्ट तयार केले होते, आता तिथे काय केले जात आहे? तो प्लॉट एका ट्रस्टला दिला जात आहे. आपण या विरोधात लढले पाहिजे. आपण मुंबईचा जेव्हा जेव्हा विचार केला, तेव्हा आपण या मुंबईसाठी खूप काही केले आहे. आंतरराष्ट्रीय स्तराचे फुटबॉल ग्राऊंड आपण तयार केले होते. दुसरी गोष्ट म्हणजे नवी मुंबईला सिडको महाराष्ट्र फुटबॉल सेंटर ऑफ एक्सलेन्स सुरू केले.

पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, आज मी सगळ्यांना विनंती करत आहे, आज मुंबईत अनेक मोठे प्रकल्प येत आहेत. पण विकास हा शाश्वत असला पाहिजे. आपल्याकडे पायाभूत सुविधांचा अभाव असल्याने आज आपण फुटबॉलमध्ये १३८ क्रमांकावर आहोत. खेळाडू चांगले आहेत, कोचेस चांगले आहेत, मात्र चांगल्या मैदानांचा अॅक्सेस नाही.

आदित्य ठाकरे म्हणाले, आज मी कुठेतरी ऐकले की मुख्यमंत्री जेन-झीसोबत संवाद साधत होते आणि तेव्हा त्यांनी म्हटले होते की नक्कीच मुलांनी स्क्रीन पेक्षा मैदानावर असावे, असे फडणवीस साहेब बोलले. अहो मुख्यमंत्री साहेब मैदान तुम्ही ठेवताय कुठे? ही मागची एसआरए तुमच्या मित्राच्या घशात टाकले आहे, मुंबईतले अनेक जागा भाजपच्या नेत्यांना देण्यात आले असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला आहे. यावेळी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की या आंदोलनाला आपण नाव दिले आहे ऑपरेशन रेड कार्ड.

## मनोज जरांगे यांची लढाई आमच्या विरोधात नाही': त्यावर सरकार निर्णय घेईल, छगन भुजबळ यांचे विधान



**मुंबई :** एकीकडे मनोज जरांगे पाटील हे आगामी २९ ऑगस्टच्या आंदोलनाची जोरदार तयारी करत असतानाच, दुसरीकडे ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी बऱ्याच काळानंतर आज समता परिषदेची महत्त्वाची बैठक घेतल्याने राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. राज्यातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांसोबत संवाद साधत भुजबळांनी समता परिषदेच्या आतापर्यंतच्या कार्यक्रमांचा आढावा घेतला आणि विविध राजकीय व सामाजिक मुद्द्यांवर भाष्य केले. या विशेष बैठकीत त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या २९ ऑगस्टला होणाऱ्या आंदोलनावर आपली स्पष्ट भूमिका मांडली. तसेच, ओबीसी आरक्षण संपल्याबाबत लक्ष्मण हाके यांच्याकडून सातत्याने होत असलेले वक्तव्यही पूर्णपणे अमान्य असल्याचे ठामपणे नमूद केले.

छगन भुजबळ म्हणाले, कोण म्हणतंय ओबीसीचे आरक्षण संपले? जात पडताळणीमध्ये चुका असेल तर त्यावर आम्ही लढतोय. २०११ पासून जात जनगणना करावी ही आमची मागणी होती, त्यावर सरकारने निर्णय घेतला आहे. सरकार आमच्यासोबत आहे, त्यावर आम्ही आता काय बोलणार, असा सवाल भुजबळ यांनी उपस्थित केला. तसेच महात्मा फुले यांचे वाङ्मय भाषण यावर आम्ही मागणी केली त्यावर सरकार काम करत आहे, अशी माहिती देखील भुजबळ यांनी दिली आहे.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, मनोज जरांगे यांची लढाई आमच्या विरोधात नाही, त्यावर आम्ही काय बोलणार, सरकार त्यावर बोलतील आणि निर्णय घेतील. आम्ही जात जनगणना मागणी केली, त्यावर सरकार काम करत आहे. ओबीसीमध्ये किती जाती त्यावर सरकार निर्णय घेणार आहे. प्रत्येक राज्यात ओबीसींचे नाव त्यावर आम्ही मागणी केली, तो शोध घेतला जात आहे. माळी समाज हा महाराष्ट्रात आहे, जेव्हा लढ्याचे तेव्हा मंत्रिपदाचा राजीनामा देऊन आम्ही राज्यात फिरलो. छगन भुजबळ हा काय घाबरला? असा सवालही नाही, असे सांगत त्यांनी जेव्हा गरज होती तेव्हा आपण लढलो असल्याचे स्पष्ट केले. तसेच सरकार आमच्यासोबत असून चर्चेतून आम्ही मार्ग काढत असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात एल निनोच्या प्रादुर्भावावर बोलताना छगन भुजबळ म्हणाले, राज्यात एल निनोचा मोठा प्रादुर्भाव सर्वत्र दिसत आहे. काही ठिकाणी प्रचंड पाऊस झाला आहे, तर काही ठिकाणी पाऊसच नाही. पुन्हा उष्णता वाढलेली आहे, हा ग्लोबल वॉर्मिंगचा परिणाम आहे. तसेच एसआयआरबाबत बोलताना भुजबळ म्हणाले, जे कोणी नेते आहेत, ज्यांना निवडणूक लढवायची आहे त्यांनी यावर काम केले पाहिजे. सारकारच्या सोबत काम केले पाहिजे, असा सल्ला त्यांनी दिला आहे.

आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या कामासंदर्भात बोलताना छगन भुजबळ म्हणाले, तुकाराम मुंढे चांगले काम आहेत, अन्न हा असा प्रकार आहे, जो श्रीमंत गरीब सर्वांसाठी आवश्यक आहे. स्वच्छता असणे हे त्यासाठी महत्त्वाचे आहे. तुकाराम मुंढे ज्यावर बोट ठेवतात त्यावर सगळेच मागणी करतात, तशीच मागणी अंगणवाडी समितीने केल्याचेही भुजबळ यांनी म्हटले आहे.

## सुपा MIDC मधील प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई : पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटलांचे आदेश

**अहिल्यानगर :** पुणे महामार्गावरील सुपा औद्योगिक वसाहतीतील काही कंपन्यांकडून दूषित सांडपाणी सोडून परिसरातील नैसर्गिक पाणीस्रोत प्रदूषित केले जात असल्याच्या अनेक तक्रारी नागरिकांकडून समोर आल्या होत्या. या गंभीर प्रकाराची दखल घेत जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रशासनाला कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. प्रदूषण करणाऱ्या या कंपन्यांची सविस्तर माहिती संकलित करून त्यांच्याविरोधात तातडीने कारवाईचा प्रस्ताव तयार करण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी औद्योगिक विकास महामंडळ आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

नैसर्गिक पाणीस्रोतांच्या प्रदूषणाबरोबरच स्थानिक रोजगाराच्या प्रश्नावरही पालकमंत्री विखे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतल्याचे पाहायला मिळाले. सुपा औद्योगिक वसाहतीतील जे उद्योजक स्थानिक भूमिपुत्र आणि युवकांना नोकऱ्या देण्यास टाळाटाळ करतात, अशा उद्योजकांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घालू नका, असे सक्त निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. यामुळे स्थानिक तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न मार्गी लागण्यास मोठी मदत होणार असून, स्थानिकांना डावलणाऱ्या आणि नियम मोडणाऱ्या कंपन्यांवर प्रशासनाचा वचक निर्माण होणार आहे.

सुपा औद्योगिक वसाहतीतील विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी सुपा येथे विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी त्यांनी प्रशासनाला हे निर्देश दिले. या महत्त्वपूर्ण बैठकीला स्थानिक आमदार काशिनाथ दाते, अतिरिक्त जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी गणेश राठोड यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे आणि विश्वनाथ कोरडे आदी मान्यवर उपस्थित होते. नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निरसन करून प्रशासनाने लवकरात लवकर कारवाईचा अहवाल सादर करावा, असे या बैठकीत निश्चित करण्यात आले. सुपा औद्योगिक वसाहत आणि परिसरातील वाढत्या अतिक्रमणांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत. सार्वजनिक बांधकाम आणि राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांनी विशिष्ट कालमर्यादा निश्चित करून ही अतिक्रमण हटाव मोहीम राबवावी. तसेच, सुपा बसस्थानक परिसरातील सातत्यपूर्ण वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी तातडीने अतिक्रमणे हटवून अतिरिक्त वाहतूक पोलिसांची नियुक्ती करावी. यासोबतच, पावसाळ्यात गटारीचे सांडपाणी रस्त्यावर साचून नागरिकांना होणाऱ्या त्रासाची प्रशासनाने अत्यंत गांभीर्याने दखल घेत उपाययोजना कराव्यात, अशा कडक सूचनाही त्यांनी दिल्या आहेत.

नगर-पुणे महामार्गावरील नारायणगव्हाण येथील प्रलंबित रस्ता रुंदीकरणाच्या प्रश्नावरही या बैठकीत तोडगा काढण्यात आला. रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक असलेल्या जमिनीबाबत स्थानिक गावकऱ्यांशी सकारात्मक चर्चा करावी. त्यानंतर भूसंपादन प्रक्रिया राबवून बाधितांना योग्य तो मोबदला मिळवून द्यावा आणि उर्वरित जमिनीचे तत्काळ सर्वेक्षण करावे, असे निर्देश विखे पाटील यांनी संबंधित यंत्रणांना दिले. तसेच, या परिसरातील गायरान जमिनी आणि अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

सुपा औद्योगिक वसाहतीतील कंपन्या स्थानिक तरुणांना डावलून बाहेरील कामगारांना कामावर ठेवत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. यावर चिंता व्यक्त करत, रोजगारात स्थानिक भूमिपुत्रांनाच प्राधान्य मिळायला हवे, अशी स्पष्ट भूमिका पालकमंत्र्यांनी मांडली.

याप्रकरणी औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी जातीने लक्ष घालून सविस्तर माहिती सादर करावी. तसेच, स्थानिकांच्या नोकरीच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी पुढील आठवड्यात थेट कामगार आयुक्तांसमवेत विशेष बैठक आयोजित करून कठोर कार्यवाही केली जाईल, असे ठोस आश्वासन विखे पाटील यांनी दिले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २४ ऑगस्ट २०२६

## श्री संत सावता माळी महाविद्यालयाच्या वतीने माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा संपन्न



**फुलंब्री :** श्री संत सावता माळी महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने महाविद्यालयातील २००१-०२ ते २०२५-२६ या वर्षातील बी. ए., बी. कॉम. व बीएस्सी पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे एकत्रीकरण व स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला. या स्नेहमिलन सोहळ्याचे प्रास्ताविक माजी विद्यार्थी संघटनेचे प्रमुख, डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी विविध शैक्षणिक वर्षाचे समन्वयक, डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रा. चंद्रनयन वाघमारे, डॉ. सुरेश मुंढे, डॉ. महेश थोरात यांनी उपस्थित माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी कोणकोणत्या ठिकाणी कोणते कार्य करत आहेत. आपण महाविद्यालयाच्या उत्कर्षासाठी काय करू शकतो याचे चिंतन या कार्यक्रमात करण्यात आले. तथा पुढील शिक्षण घेऊन विद्यार्थी कोणत्या सेवेत आहेत याचा स्नेहपूर्वक आढावा घेऊन विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच या माजी विद्यार्थी संघटनेत काही विध्यार्थ्यांनी आजीवन सभासदत्वाची नोंदणी करून घेतली. अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## अवैध धंद्यांना थारा नाही; माहिती द्या, तत्काळ कारवाई - ठाणेदार संजय मातोंडकर




**किनगाव राजा (महेश मुंढे) :** पोस्टे किनगाव राजा चे कर्तव्यदक्ष ठाणेदार श्री. संजय मातोंडकर यांनी गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी अनोख्या शैलीत ग्रामस्थांचे प्रबोधन केले.यावेळी मार्गदर्शन करताना ठाणेदार मातोंडकर म्हणाले, "आम्ही गोपनीय माहिती काढून अवैध धंद्यांवर तत्काळ कारवाई करतो. गावात कुठेही दारू, जुगार, अवैध धंदा सुरू असल्यास नागरिकांनी न घाबरता डायल ११२ वर कॉल करून माहिती द्यावी, माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल."पुढे बोलताना त्यांनी पालकांना सज्जड दम भरला - "जर लहान वयातच मुले दारू पिऊन रस्त्यावर झिंगत असतील तर याला जबाबदार आई-वडील असतील. आपल्या मुलांकडे लक्ष द्या, त्यांच्यावर चांगले संस्कार करा, हीच काळाची गरज आहे."गावात कायदा सुव्यवस्था टिकवण्यासाठी ग्राम सुरक्षा दल अधिक मजबूत करा आणि दारूबंदी विभागासोबत समन्वय ठेवून गाव गुन्हेगारीमुक्त करा, असे आवाहन त्यांनी केले.पोलीस कामगिरीचा आलेख :*- दारूबंदी : ९५ केसेस - गेल्या वर्षी ६७, यंदा २८ ने जास्त कारवाई- जुगार : २१ केसेस - गेल्या वर्षी ०८, यंदा १३ ने जास्तठाणेदारांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## डॉ. बा. आं. म. विद्यापीठाचा ६८ वा वर्धापनदिन साजरा







**गुंजोटी (प्रा.नागसेन कांबळे) :** येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६८ वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला.या वर्धापनदिन कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्रीकृष्ण शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती विभावरीताई शाईवाले, श्रीकृष्ण शिक्षण संस्थेच्या उपसचिव श्रीमती मंदाकिनीताई पाटील उपस्थित होत्या.श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड ,प्रा. डॉ.आर.एन.निगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या ध्वजारोहण कार्यक्रमाची सुरुवात संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विभावरीताई शाईवाले यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यानंतर विभावरीताईंच्या हस्ते विद्यापीठध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांनी केले.त्यांनी मराठवाडा विद्यापीठाचे प्रारंभिक रूप सांगून १९५८ पासून विद्यापीठाने कशी चढत्या क्रमाने प्रगती केली याचा आढावा घेत, नामविस्तारानंतर विद्यापीठाचे सद्यस्थितीतील वास्तव सर्वांसमोर ठेवत, आजपर्यंतच्या विद्यापीठाच्या प्रवासाच्या प्रवासाचा मागोवा घेतला.

यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येनी उपस्थित होते. राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए

मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ ऑगस्ट २०२६


## मेहगाव येथे अवैध वृक्ष वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त



**कन्नड (अरुण थोरात) :** मेहगाव ता. कन्नड शिवारात अवैधरित्या वृक्षतोडी ची वाहतूक करणारा ट्रॅक्टर दि. २२ जून रोजी प्रा.वनविभागाने कारवाई करत जप्त केला आहे.याबाबत मिळालेल्या माहितीनुसारदि. २२ ऑगस्ट रोजी संध्याकाळी पिशोर कन्नड रोड वरील मेहगाव ता.कन्नड येथे एक विना क्रमांकाचे ट्रॅक्टर शिरस प्रजातीचे अवैध वृक्षतोडीचा मुद्देमाल भरून विनापरवाना वाहतूक करत असल्याचे वनविभाग कर्मचाऱ्यांना आढळून आल्याने सदरील ट्रॅक्टर ताब्यात घेऊन आरोपीं विरुद्ध वन कायद्यांतर्गत वनगुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदर कारवाई उपवनसंरक्षक सुवर्णा माने, सहायक वनसंरक्षक विशाल कवडे, तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी कन्नड शिवाजी टोम्पे यांचे मार्गदर्शनात वनपाल पिशोर रफिक पठाण, वनरक्षक हस्ता कृष्ण माळी, वनरक्षक पिशोर बाळू चव्हाण, वनरक्षक भारंबा अश्विनी लांडे यांनी केली. पुढील तपास वनपाल रफिक पठाण वनपाल पिशोर करीत आहेत.

*अवैध वृक्षतोड व वाहतूक करणाऱ्यांवर संबंधित कायद्यानुसार उचित कारवाई केली जाईल. अशा घटना आढळून आल्यास वनविभागास तात्काळ कळवावे. माहिती देणाऱ्यांचे नाव गुप्त ठेवण्यात येईल. ~*

शिवाजी टोंपे वन परिक्षेत्र अधिकारी कन्नड (प्रा.)


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903


## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त इन्क्युबेशन सेंटरचे उद्घाटन



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त करिअर कट्टाच्या अंतर्गत इन्क्युबेशन सेंटर चेउद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठाच्या 68 व्या वर्धापन दिनानिमित्त प्राचार्य डॉ अस्वले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग , महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आयोजित करीअर कट्टा अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची भावना निर्माण करणे, त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना योग्य दिशा देणे, स्टार्टअपच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच विद्यार्थ्यांना उद्योग व व्यवसाय क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्यांचे मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने इन्क्युबेशन सेंटर सुरू करण्यात आले आहे.यावेळी प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीचा शोध न घेता स्वतःच्या नाविन्यपूर्ण कल्पनांच्या माध्यमातून उद्योजक बनण्याचा प्रयत्न करावा, इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनांचे प्रकल्प व व्यवसायामध्ये रूपांतर करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन मिळणार आहे.असे आवाहन केले.या उद्घाटन प्रासंगिक यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, प्रा. जी. एस. मोरे आणि पर्यवेक्षक शैलेश महामुनी प्रभारी प्राध्यापक डॉ एस पी इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी इंक्युबेशन सेंटरचे समन्वयक डॉ. अशोक पदमपल्ले, सहसमन्वयक डॉ. श्रीशैल्य तोडकर, करिअर कट्ट्याचे डॉ. चंद्रसेन करे, डॉ. समाधान पसरकल्ले, डॉ. अर्जुन कटके, महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काळ्या बाजारात लिलाव 'जिज्ञासेचा' की भविष्याचा? GNM नर्सिंगचा कागदी फुगा फुटला!

**छत्रपती संभाजीनगर :** शैक्षणिक पटलावर पुन्हा एकदा भ्रष्टाचार आणि बेजबाबदारपणाचा काळिमा फासला गेला आहे. रुग्णसेवेचे पवित्र व्रत घेणाऱ्या GNM नर्सिंग परीक्षेचा पेपर थेट बाजारात फुटून उघड्यावर विकला जावा,याहून मोठे दुर्दैव ते कोणते? जे हात उद्या रुग्णांच्या नाडीवर धडधडणारे आयुष्य वाचवणार आहेत,तीच हात आज परीक्षेआधी फुटलेल्या प्रश्नपत्रिकांच्या छायेत पिचली जात असतील,तर हा केवळ एका परीक्षेच्या गळतीचा विषय नाही; तर हा संपूर्ण आरोग्य यंत्रणेच्या विश्वासावर झालेला जीवघेणा हल्ला आहे.अभ्यासाच्या समिधा अर्पण करून अहोरात्र कष्ट उपसणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची राखरांगोळी आणि 'सर्टिफिकेट' विकत घेणाऱ्या लाचखोरांची चांदी! हा प्रकार म्हणजे शिक्षणाच्या पवित्र मंदिरात मांडलेला उघडउघड लिलाव आहे. पेपरफुटीच्या या मालिकेमुळे परीक्षा मंडळ आणि प्रशासकीय यंत्रणेचा नाकर्तेपणा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.बंद दाराआड चालणारे हे गैरव्यवहाराचे साखळी नेटवर्क नेमके कोणाच्या आशीर्वादाने फोफावते आहे,असा जळजळीत सवाल आता जनतेच्या मनात निर्माण होत आहे.केवळ चौकशीच्या पोकळ घोषणा आणि तात्पुरत्या निलंबनाचे नाटक करून हे पाप धुऊन निघणार नाही.या रॅकेटच्या मुळाशी असणाऱ्या सूत्रधारांच्या मुसक्या आवळून त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे.

रुग्णसेवेची धुरा सांभाळणाऱ्या भावी परिचारिकांच्या भवितव्याशी खेळणारा हा 'काळा बाजार' समूळ नष्ट झाला नाही,तर उद्याच्या आरोग्यव्यवस्थेचे भवितव्य केवळ आणि केवळ व्हेंटिलेटरवरच दिसेल.


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २४ ऑगस्ट २०२६


## गुन्ह्यांबाबत शून्य सहनशीलता, पीडितांबाबत संवेदनशीलता प्रभावी पोलीस व्यवस्थेचे सूत्र असावे - विजया रहाटकर

**छत्रपती संभाजीनगर / बीड (भगवंत पाळवदे) :** महिलांची सुरक्षा हा केवळ कायदा व सुव्यवस्थेचा विषय नसून, सुशासनाचा महत्त्वाचा निकष आहे. पीडित महिलेचे म्हणणे कोणताही पूर्वग्रह न ठेवता शांतपणे ऐकावे आणि तिच्या सन्मानाची काळजी घ्यावी. गुन्ह्यांबाबत शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबताना पीडितांबाबत कमाल संवेदनशीलता राखणे, हे प्रभावी पोलीस व्यवस्थेचे सूत्र असले पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.राष्ट्रीय महिला आयोग व महाराष्ट्र पोलिसांच्या वतीने आयोजित ‘शक्ती व सुरक्षा’ कार्यक्रमांतर्गत सायबर गुन्ह्यांविरोधात पोलिसांची क्षमतावृद्धी कार्यशाळेत त्या बोलत होत्या. याप्रसंगी राष्ट्रीय महिला आयोगाचे सदस्य सचिव सुदीप जैन, मुंबई उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती साधना जाधव, राज्याच्या महिला गुन्हे प्रतिबंधक विभागाच्या विशेष पोलीस महानिरीक्षक शारदा राऊत, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, राज्य महिला आयोगाच्या सदस्या सचिव नंदिनी आवाडे, पोलीस उपायुक्त पंकज अतुलकर, राष्ट्रीय महिला आयोगाचे संचालक राम अवतार सिंह व समन्वयक सर्वेश पांडे आदी उपस्थित होते.श्रीमती रहाटकर म्हणाल्या की, केवळ तक्रार स्वीकारून किंवा एफआयआर नोंदवून पोलिसांचे कर्तव्य संपत नाही. पीडित महिलेला वन स्टॉप सेंटर, संरक्षण अधिकारी व मोफत कायदेशीर मदतीची माहिती देऊन संबंधित यंत्रणांशी जोडून द्यावे. पोलीस, संरक्षण अधिकारी, महिला व बालविकास विभाग आणि इतर यंत्रणांमध्ये समन्वय वाढवावा.त्या पुढे म्हणाल्या की, तक्रारदार महिलेबाबत कोणताही पूर्वग्रह ठेवू नये. तिला पुरेसा वेळ देऊन तिचे म्हणणे मध्येच न तोडता ऐकून घ्यावे. आघातामुळे घटनेचा क्रम सांगताना पीडितेला अडचण येऊ शकते. त्यामुळे घाईघाईने निष्कर्ष काढू नयेत. सन्मानपूर्वक वागणुकीतून तिचा पोलिसांवरील विश्वास वाढतो.बदलत्या काळानुसार गुन्ह्यांचे स्वरूपही बदलत आहे. सायबर गुन्हे, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून होणारी फसवणूक, बनावट चित्रफिती आणि डिजिटल आर्थिक फसवणुकीसारख्या आव्हानांचा सामना करण्यासाठी पोलिसांनी तंत्रज्ञान, माहिती आणि वैज्ञानिक पद्धतींचा प्रभावी वापर करावा. महिलांना त्यांच्या कायदेशीर अधिकारांची माहिती देणेही आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.प्रत्येक तक्रार गांभीर्याने घेऊन तपास निष्पक्षपणे व वेळेत पूर्ण करावा. ‘सुरक्षित महिला म्हणजे सक्षम समाज आणि सक्षम समाज म्हणजे सक्षम राष्ट्र,’ हे सूत्र लक्षात घेऊन सर्व यंत्रणांनी एकत्रित काम करावे. महाराष्ट्र पोलीस महिलांना न्याय देण्यासाठी प्रभावीपणे काम करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.श्री. जैन म्हणाले की, पीडित महिला पोलीस ठाण्यात येते तेव्हा पोलीस हे तिच्यासाठी सरकारचे पहिले द्वार असतात. त्यामुळे महिलांचे म्हणणे कोणताही पूर्वग्रह न ठेवता संवेदनशीलतेने ऐकावे. तक्रारीस विलंब झाला म्हणून प्रश्न उपस्थित करू नयेत आणि बळजबरीने तडजोड करण्याचा प्रयत्न करू नये.प्रत्येक प्रकरणात भक्कम पुरावे गोळा करून कायदेशीर कर्तव्य पार पाडावे. त्याचबरोबर पीडितेचा सन्मान राखून तिला आवश्यक आधार द्यावा. पोलिसांची संवेदनशील वागणूक पीडितेच्या आयुष्यावर सकारात्मक परिणाम करू शकते. महिलांच्या सन्मानाची व सुरक्षेची संस्कृती पुढे नेणे आवश्यक आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी खंबीरपणे कर्तव्य बजावताना संवेदनशीलताही जपावी. संवेदनशीलता ही प्रभावी व व्यावसायिक पोलीसिंगची ताकद असल्याचे त्यांनी सांगितले.श्री. पवार म्हणाले की, डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे होत आहे. त्यामुळे अशा गुन्ह्यांचा प्रभावी तपास करण्यासाठी पोलिसांची तांत्रिक क्षमता वाढविणे आवश्यक आहे. सायबर गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यासाठी तपासाच्या आधुनिक पद्धतींचा प्रभावी वापर करावा. त्याचबरोबर सायबर गुन्ह्यांच्या पीडितांना तातडीने मदत मिळण्यासाठी सक्षम आणि तत्पर प्रतिसाद व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे.सायबर गुन्ह्यांचा तपास करताना तांत्रिक कौशल्याबरोबरच पीडितांशी संवेदनशीलतेने संवाद साधणे महत्त्वाचे आहे. पीडितांना योग्य आधार देऊन त्यांच्या गरजा समजून घेणारी पीडित-केंद्रित कार्यपद्धती पोलिसांनी स्वीकारावी. यामुळे पोलीस व्यवस्था अधिक जबाबदार, व्यावसायिक व नागरिकाभिमुख होण्यास मदत होईल. या प्रशिक्षणातून आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर व संवेदनशील पोलीसिंग अधिक सक्षम होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.प्रास्ताविकात श्रीमती राऊत म्हणाल्या की, या कार्यशाळेचा मुख्य उद्देश वाढत्या सायबर गुन्ह्यांचा प्रभावी तांत्रिक तपास व दोषसिद्धीचे प्रमाण वाढविणे हा आहे.

तसेच, पोलिसांमध्ये पीडित-केंद्रित संवेदनशील दृष्टिकोन रुजवून सक्षम आणि तत्पर प्रतिसाद प्रणाली निर्माण करणे, यावर या उपक्रमांतर्गत विशेष भर देण्यात आला आहे.या कार्यशाळेस छत्रपती संभाजीनगर (शहर आणि ग्रामीण), जालना, धाराशिव, बीड, हिंगोली, परभणी, नांदेड, लातूर आणि रेल्वे पोलीस दलातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. तसेच सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा आणि महिला मदत कक्षातील (भरोसा सेल) १५० पोलीस अधिकारी आणि २०० पोलीस अंमलदार या प्रशिक्षणात सहभागी झाले होते

## शिवहरी मुंडे यांची केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीच्या राज्य प्रमुख सल्लागारपदी निवड



**छत्रपती संभाजीनगर :** वैधमापन शास्त्र (वजन-माप) विभागाचे सेवानिवृत्त जिल्हा उपनियंत्रक श्री. शिवहरी येडूबा मुंडे यांची 'केंद्रीय ग्राहक संरक्षण समिती'च्या महाराष्ट्र राज्य प्रमुख सल्लागारपदी निवड करण्यात आली आहे.समितीचे संस्थापक अध्यक्ष ॲड.मिर्झा जावेद एन. बेग यांच्या आदेशाने व संस्थापक सचिव एम.बी.पाटील यांच्या शिफारशीनुसार प्रदेश अध्यक्ष अमोल रमेश चतुर यांनी जिल्हाध्यक्ष श्री.विजय म्हस्के पाटील यांच्या उपस्थितीत हे नियुक्ती पत्र प्रदान केले.शासकीय सेवेतील प्रदीर्घ अनुभवाचा वापर करून राज्यातील ग्राहकांच्या हक्कांचे रक्षण करणे आणि ग्राहक जागृतीला गती देणे हे आपले मुख्य प्राधान्य असेल,असा विश्वास मुंडे यांनी व्यक्त केला.या निवडीबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## माणसातली माणुसकी

पद पैसा धन संपत्तीही,<br>
जातांना सोबत येत नाही.<br>
माणसातली माणुसकी,<br>
सदा मदतीने जिवंत राही. १

माणसातली माणुसकी,<br>
भाऊ आता जिवंत ठेवा.<br>
अडल्या नडल्या लोकांची,<br>
करावेच अडचणीत सेवा. २

माणसातली माणुसकी,<br>
कर्मात तुमच्या असावे.<br>
पद पैसा धनसंपत्तीचा,<br>
गर्व जगतांना कधी नसावे. ३

माणुसकीने माणसाला,<br>
जगतांना जीव लावावे.<br>
अडचणीत माणसांच्या,<br>
सर्वात अगोदर धावावे. ४

निस्वार्थपणे सेवा करून,<br>
मानवधर्माची सेवा करा.<br>
निस्वार्थ सेवा करता करता,<br>
जीवनात तुम्ही आनंद भरा. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**





महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ ऑगस्ट २०२६


# समकालीन समाज परिवर्तनाची संघर्ष गाथा : पालट




**जे**ष्ठ साहित्यिक कांदबरीकार दि.बा.पाटील यांची 'पालट' कादंबरी म्हणजे गाव खेड्यातील समकालीन राजकीय वर्तमानाचे वास्तववादी धारधार निर्धाराची सडेतोड कादंबरी पालट.आजच्या सामाजिक राजकीय व्यवस्थेचा सांगाडा हा अजूनही गावखेड्याशी निगडित आहे.पिढ्यांनपिढ्यापासून हा राजकिय तिढा सुटत नाही कारण बेभरवशाची अवसानघातकी आश्ववासन देणारी हीराजकीय व्यवस्थेची निवडून दिलेली बांडगूळ ही कुराणात सोडलेली सांड आहेत.त्यांनी निवडून आल्यावर नुसतं भ्रष्टाचारी कुरणात चरत राहायचं.मालामाल होऊन ढेरींवंत व्हायचं.पुढच्या पंचवार्षिक निवडणुकीत पुन्हा दारोदार मताची विकतं भिक मागाची.दानात दान महा दान म्हणजेमतदान.या लोकशाही संविधानिक प्रजासत्ताक्तेची संविधानाची आन (शपत) घेऊन सांगतो असं म्हणून यालोकशाहीचा वापर फक्त बोटावर शाई लावूस्तोवर.पुढे लाऊन थूका साधून मोका.असे राजकीय सामाजिक आर्थिक परिस्थितीचा झेंडा मिरवत.गावखेड्याच्या गल्लोगल्ली ते शहराच्या मध्यवर्ती भागाच्या सभागृहात पैसे देऊन सभेला तोबा गर्दी जमा करायची.वर्तमान ते समकालीन सारे डिजिटल फंडे वापरून राजकारण यशस्वी करून दाखवचं.मग ही अंशी वर्षाची लोकशाही जेव्हा धायमोकलून रडते.तिचे यथोचित निर्भिडपणे चित्रण या वास्तवादी कादंबरीत आले आहे."संतू,संताजी,संतूसेठ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या निष्पाप, निगर्वी, समाजाभिमुख काम करणाऱ्या,जात धर्मापलीकडे जाऊन समाजपरिवर्तनाचा ध्यास घेतलेल्या नायकाभोवती 'पालट'कादंबरीचं कथानक गुंफले आहे "(मनोगत) दि.बा. पाटील यांच्या पालट कादंबरी मुळ गाभा हा आजच्या समकालीन वास्तवाचे गावं खेड्यातील तरुणांची होणारी मानसिक होरपळ उघड्या डोळ्यांनी पाहावी लागते आहे.राजकारण समाजकारण,बिल्डरची मनमानी यांची बिनधास्तपणे पोलखोल या कांदबरीत येते.आपली खरी लोकशाही संविधानिक प्रजासत्ताक्तेची संविधानाची निर्मिती काय आहे ?आणि आजचे राजकारण काय आहे? याचे सडेतोड उत्तर ही कांदबरी देते.आमदाराला वाटते हा माझा बटीक झाला पाहिजे.मी सांगेल तसं हा ठुमक्यात नाचला पाहिजे पण या कादंबरीचा नायक संतूसे म्हणतो "खासदार साहेब,या रानशिवारावर,शिवारातल्या पशुपक्ष्यावर प्रेम करणाऱ्या शेतकऱ्याचा मुलगा आहे.जमिनीत राबल्याशिवाय जगण्याचं काहीही साधन नव्हतं आमच्याकडं.बाहत्तरच्या दुष्काळापासून आजपर्यंत चाललेली शेतकऱ्यांच्या जगण्याची धडपड आणि होरपळ मी अनुभवलीय.कर्जबाजारीपणामुळं आबांनी शेत विकलं.त्यामुळे मी खचलो होतो.मिळेल ते काम करण्याचा निर्धार केला.मी कमावलेल्या शरीरसंपदेनं आणि पैलवानकीनं माझ्या आयुष्याला असं काही वळण दिलं की,त्या वळणाने मला सोनेरी दिवस दाखवले.साहेब परमेश्वरानं मला खूप काही दिलंय.मी समाधानी आहे.कुठं थांबावं हे मला कळतंय म्हणून हे खुरटं जंगल मी निसर्गाला दान दिलंय.हे दान मी परत घेऊ शकत नाही"हे उत्तर ऐकून खासदार शरमिंदे झाले (पृ.310)या कथेतील नायक संतूसेठ आपल्या धारधार निर्धाराने ही राजकारण्यांची लढाई लढतो.गावातील तरूणांचा तो ताईत होतो.आजच्या तरुणाईचा जगण्याचा प्रश्न तर आहेच पण जीवघेनी स्पर्धा करूनही इथल्या शैक्षणिक भ्रष्टाचारात गाव खेड्यातील मूलं उध्वस्त होता आहेत.गाव खेड्यातील गावकऱ्यांना आजतागयत केवळ खोटी आश्वासने देऊन अशा कित्येक पंचवार्षिक निवडणुका लढवणारी आणि तरुणाईचा वापर करून त्यांना व्यसनाधीन केले जाते आहे.या अमृतवाडी या गावाची ही दर्दभरी कैफियत या कादंबरीत दिसून येते.पालट कादंबरीचा नायक संतू हा आपल्या मायबापाचा एकूलात एक लेक होता.बापाचे स्वप्न म्हणजे कोल्हापूरला तालमीत जाऊ 'महाराष्ट्र केसरी' व्हायचं.म्हणून तो दहावी नंतर का◌ॅलेज व तालीम सुरू करतो.इकडे बाप कर्जबाजारी होऊन त्याच्या ध्येयासाठी संतूला पैसे पाठवत राहतो.दोन मुलींचे लग्न व संतू चे शिक्षण यासाठी वावर विकावे लागते.संतू गावाकडे आल्यावर आपल्या कर्जबाजारी बापाचे दुःख व अपमान सहन होत नाही.बापला या कर्जातून मुक्त करतो.म्हणून कुठेतरी नोकरी केली पाहिजे.पण बापजाद्याची जायजाद टिकवली पाहिजे.गावात इज्जत राहिली पाहिजे.कारण संतूचा बाप गोपाळराव पाटील गावचा सरपंच होता.म्हणून तो तालिम व शिक्षण चालू ठेवून जीवाच रानकरीत संघर्ष करीत राहतो.गाव शिवार,माती माणसं याचा संतूला प्रचंड जिव्हाळा होता.या शहराच्या गच्चांड्यात येऊन अंगापिंडाने पहिलवान असल्याने एक बिल्डरने त्याला आपला बा◌ॅडीगाड म्हणून कामाला ठेवले.संतूचा प्रमाणिकपणा व कामावरची निष्ठा पाहून त्याच्या हातात सारा कारभार दिला.संपत्तीच्या काळ्या व्यवहारात त्याच्या नावावर जमीनीचा व्यवहार केला.तसा दुसरा बिल्डर तो भलताच खतरनाक होता.तो संतूला पकडून ती जमीन तूला मला विकावी लागेल तू गपगुमान माझ्या बरोबर व्यवहार करून टाक नाहीतर तूला मारुन टाकील.इथे संतूने माझ्या नावावर फक्त जमीन केलेली माझा जीव गेला तरी हरकत नाही.मी त्यांची जमीनीचे पैसे त्यांचे त्यांना मिळाले पाहिजे.मी कधीच गद्दार होणार नाही.त्यांचा विश्वासघात मी करणार नाही.संतूची ही इमानदारी पाहून त्या जमीनीची रक्कम जितकी होती ती त्याला परत केली.तुलाही याचा मोबदला म्हणून तुझ्या नावाने बँकेत पैसे टाकतो.पण तू आज पासून माझ्या या व्यवसायात भागीदारी करायची मला राजकीय साह्य करायचे.मुंबई पर्यंत भाजीपाल्याचे मार्केटिंग संतू करु लागला.संतूचा संतूसेठ झाला.सुमन नावाच्या एका अनाथ मुली बरोबर लग्न करून तो मुंबई मध्ये मोठा संतूसेठ झाला.गावात छत्रपती संभाजी व्यायामशाळा उभारली.गावात पाण्याची व्यवस्था केली.पण बापाला न विचारता लग्न केलं.ती मागासवर्गीय पाटोळे नावांची युवती होती..कारण ती सौंदर्यवंती होती.संतूचा वर्गमित्र शाम हा सर्व गोष्टींचा साक्षीदार होता.संतूला मुलगा मुलगी झाली हे नातवाचे फोटो आईला दाखव.गावाशिवाची खबरबात घेतं गावांसाठी संतू देणगी पाठवित होता.संतूला मायेची आठवण येतं होती.पंढरपुरच्या दिंडीत आई आपल्याला नक्कीच भेटेल म्हणून बायको सूमन व मुलं घेऊन तो पंढरपूरची पांडुरंगाच्या दिंडीत आईला शोधू लागला.तसा अंगापिंडाने भरलेला व पांढऱ्याशुभ्र कपड्यात संतू साऱ्या वारकऱ्याचं लक्ष वेधून घेतं होता. इतक्यात आईला दिसला तिनं मोठ्यानं हाक मारली.तशी सारी दिंडी थबकली तो आईच्या गाळ्यात पडला.तशी त्याची बायको सूमन डोई भरून पदर घेतं सासूबाईच्या पाया पडली.नांतवाना जवळ घेतले.संतूने साऱ्या वारकऱ्यांना मिठाई खाऊ घातली.दींडीपासून गाव शिवारात संतूसेठचे नावं झाले.स्थानिक गावातील खडगुळ राजकारणी सरपंच उपसरपंच संतूचं मोठेपण त्यांना सहन होईना.आमदाराने संतूची भर सभेत गौरव केला.बापाला आनंद झाला.संतूची प्रचंड प्रगती झाली ती व्यवसायामुळे.पण आमदारांना व गावातील भावकीला संतूला मिळालेली सौंदर्यवती बायको म्हणजे ती खानदानी वाटत होती.संतूसेठ बापाला मुंबईला घेऊन जातो.सारी मुंबई फिरवतो.मुंबईतील याचा बंगला नोकर चाकर पाहून ते खूश झाले. आपल्या पोराने नावं कमावलं.पुणे मुंबई शहरातील विविध उद्योग व्यवसाय आणि महामुर पैसा.यासाठी संतूला आपल्या गावाचा विकास केला.माय बापाचे नाव कमविले 'श्रीमती काशीबाई गोपाळराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,अमृतवाडी 'ती अक्षर वाचताना संतूसेठच्या डोळ्यांना अश्रूच्या धारा लागल्या.ते अश्रू आई वडीलांच्या आठवणीचे व आबांच्या स्वप्नपूर्तीच्या आनंदाचे होते.यापेक्षा आपण गावासाठी काय करायचं बाकी राहिलं? माणसाचं आमुलाग्र आयुष्य बदलणाऱ्या शिक्षणासाठी आपण खारीचा का होईना वाटा उचलला.धन्य झालो भरून पावलो.'(पृ.335) पालट कादंबरीकार दि.बा पाटील यांच्या लेखणीतून ही आजच्या समकालीन वास्तवाची प्रखर जाणीव करून देणारी ही कादंबरी आहे.वाळवा, सांगली येथील गाव शिवाराचं निसर्ग वर्णन मनाला भुरळ पडतं.अतिशय मनोवेधक कथानक आणि तितक्याच सविनय शैलीचा दमदार अभिव्यक्तीचा नायक संतूसेठ.बेरकी राजकारणी संतूचा स्वार्थासाठी कसा वापर करून घ्यायचा पण बळकट मनोधैर्याचा सत्यवादी विवेक विचार धारणेचा नायक धिरोदत्तपणे त्यांना सामोरं जातो.कारण भक्त आपण गावाशिवाच देणं लागतो आहे.आपल्याला आई वडिलांचे नांव कमवायचे आहे.जात पात धर्म या गचफण्या गोष्टीला संतसेठने कधीचं थारा दिला नाही.सर्व जातीधर्माचे लोकं एकत्र करून त्यांना आनंद देऊन शिक्षणाच्या पवित्र प्रवाहात आणले हा अमृतगावाचा कायापालट म्हणजे हीकादंबरी.ख्यातनाम समीक्षक डॉ रवींद्र ठाकूर यांची पाठराखण अशी "पुरातन काळापासून या देशातील धर्मसत्ता व राजसत्ता विशिष्ट लोकांच्या हाती होती.त्या व्यवस्थेला आव्हान देणे सर्वसामान्यांना शक्यच नव्हते.म्हणून दि.बा.पाटील सारखे लेखक या व्यवस्थेला आव्हान देणारी 'पालट'सारखी कादंबरी लिहितात.कादंबरीचा नायक कालबाह्य झालेल्या प्रथा, पंरपरा लाथाडून नवे परिवर्तनवादी विचार अंगीकारत घराणेशाही मोडीत काढतो.व जगण्याचा नवा आदर्श निर्माण करतो.गावगाड्यातील व्यक्ती व समुहजीवनाभूव यांच्याशी तादात्म्य पावलेले कथानक कादंबरीचे निराळेपण अधोरेखित करते.पश्चिम महाराष्ट्रातील वारणा आणि कृष्णेच्या खोऱ्यात घडणाऱ्या या कादंबरीची कथावस्तू वास्तवाचे गडद गहिरे परिमाण घेऊनच अवतरते.दि.बा.यांची 'पालट' कादंबरी काळ आणि अवकाशाचा व्यापक पट आपल्या मध्ये सामावून घेताना दिसते.ती वाचकांना नवी दृष्टी प्रदान करेल याही कादंबरीचे जोरदार स्वागत होईल.यात शंका नाही (ब्लर्ब)दि.बा.पाटील यांच्या कादंबरीने तरूणांसाठी एक मंत्रच दिला आहे.व्यवसायाभिमुख झालं पाहिजे.तनमन धनाने व पावित्र्याने कार्यमग्न राहिले तर यशश्री मिळते.मान अपमान साऱ्या गोष्टी पचवून फक्त लक्षवेधी ध्येयाने या कादंबरीचा नायक संतूसेठ,पाण्याची मुबलकत्ता, विजपुरवठा या सोईसुविधेने गावाचा पालट म्हणजे गाव शिवाराचा कायापालट करतो.गावं संतूसेठला डोक्यावर घेऊन धनगरी ढोलताशाने वाजत गाजत मिरवणूक काढतो. हे आशय संपन्न सृजन समर्पक लक्षवेधी मुखपृष्ठ राष्ट्रीय किर्तीचे चित्रकार अन्वर हुसेन यांनी केले आहे.या कादंबरीची अर्पण पत्रिका ही एका प्रेरक अनुबंधाची आहे ती अशी "मालदन'च्या मातीवर नितांत प्रेम करणारा नियतीने हरवले तरीही नात्याच्या व्यवहारात स्नेहाचा सेतू उभा करून गेलेला, उद्योग क्षेत्राच्या नभांगणातला अचानक लुप्त झालेला तेजस्वी तारा युवा उद्योजक स्वर्गीय सुमित काळे देशमुख यांच्या आठवणींच्या पाऊलखुणांना!! मनस्वी शुभेच्छा.



**पुस्तकाचे नाव:- पालट (कादंबरी)**
लेखक:-दि.बा.पाटील कामेरी ता.वाळवा.
प्रकाशक:-इंद्रजित घुले शब्दशिवार प्रकाशन, मंगळवेढा
मुखपृष्ठ:-अन्वर हुसेन (राष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार)
प्रथमावृती:-१२ जुलै २०२६
मूल्य:-६००रूपये
पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके जालना
संवाद:- ९९७५१३७३३७


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २४ ऑगस्ट २०२६


## औट्रम घाटात एसटी बसचा अपघात चालकाच्या प्रसंगावधानामुळे प्रवाशांचे वाचले प्राण




**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड–चाळीसगाव(औट्रम) घाटात शनिवारी दुपारच्या सुमारास महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या छत्रपती संभाजीनगर आगारातील एमएच ४० एन ९७२६ क्रमांकाच्या छत्रपती संभाजीनगर–सुरत या मार्गावरील एसटी बसचा अपघात झाला. चालकाने दाखविलेल्या प्रसंगावधानामुळे बस खोल दरीत कोसळण्यापासून वाचली आणि बसमधील अनेक प्रवाशांचे प्राण थोडक्यात बचावले. चालक सुभाष नामदेव पल्लाळ व वाहक डी एस चोरे हे या बस वर ड्युटीवर होते. मिळालेल्या माहितीनुसार, घाटातील वळणावर बसवरील नियंत्रण सुटल्याने बस रस्त्याच्या कडेला जाऊन झाडाला व संरक्षक खांबाजवळ अडकली. बस पुढे सरकली असती तर ती थेट खोल दरीत कोसळून मोठी जीवितहानी झाली असती. मात्र चालकाने अत्यंत शांतपणे आणि धाडसाने परिस्थिती हाताळत बस थांबविल्याने मोठा अनर्थ टळला. अपघातानंतर बसमधील प्रवाशांनी घाबरून बसमधून बाहेर पडत सुरक्षित ठिकाणी धाव घेतली. काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने या अपघातात कोणतीही मोठी जीवितहानी झाली नसून प्रवासी सुरक्षित बचावले असल्याची माहिती मिळाली. कन्नड–चाळीसगाव घाट हा धोकादायक घाट म्हणून ओळखला जातो. यापूर्वीही या घाटात अनेक गंभीर अपघात घडले असून, सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी वारंवार होत आहे. या घटनेनंतर पुन्हा एकदा घाटातील सुरक्षाव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या अपघाताची माहिती मिळताच जुनला गावातील नागरिक व घाट मित्र चांगदेव राठोड, करण राठोड व त्यांचे सहकारी यांनी घटनास्थळी मदतकार्य केले. संबंधित यंत्रणा व स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. चालकाच्या प्रसंगावधानाचे प्रवाशांकडून कौतुक करण्यात येत असून, वेळेवर घेतलेल्या निर्णयामुळे अनेक कुटुंबांवरील संभाव्य दुःखद प्रसंग टळल्याची भावना प्रवाशांनी व्यक्त केली.

## शिक्षिका अन् आई

बालकांचे हित जाणे, तीच माता.
खाई जी खस्ता बाळासाठी.!!
डोळस मातेचे,संतान डोळस.
गांधारी नाशास होई कारण.

माता ती सावली होती,ज्ञानवंत.
जाणिले हित तिने , पती -कार्यात
मुक्ता,फातिमा झाल्या दोन ज्योती
दिली आम्हा डोळस ज्ञानशक्ती.

बहुमाता केली अविद्येतून मुक्ती
शिकवण देत ,झाली ती सावली
ज्ञान देऊनिया ,वाढ पदराखाली.
झुंजार ती ज्ञानी ,बिजरूप झाली.

गोड फळे आली,वृक्ष -वल्ली.
आई सावित्री,रमा तुझीच लेखणी,
निरक्षराची धार तलवार झाली.
डॉक्टर,शास्त्रज्ञ,वैमानिक लाडली.

धन्य सावित्री अन् रमाई
खऱ्या तूम्हीच शिक्षिका अन् आई.
सावित्री अन्,जिजाई रमाई.
खरंतर,तुम्हीच आम्हा ज्ञानमाई

**- (मधूबानंदा प्रधान,अकोला)**

## धर्मादाय संस्था आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष यांच्यात सामंजस्य करार करणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/बीड (भगवंत पाळवदे) :** राज्यभरातील मोठ्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांची सोय व्हावी आणि त्यांना अधिक चांगल्या सेवा-सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेतला आहे. रुग्णांच्या नातेवाईकांना मदत करणाऱ्या विविध धर्मादाय संस्था आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

मोठ्या रुग्णालयांमध्ये दररोज हजारो रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपचारासाठी येत असतात. बऱ्याचदा उपचाराचा मोठा खर्च, राहण्याची आणि जेवणाची सोय तसेच योग्य मार्गदर्शनाचा अभाव यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. हीच बाब लक्षात घेऊन या सर्व घटकांना एकाच छताखाली आणून एक सुटसुटीत आणि पारदर्शक यंत्रणा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या करारामुळे धर्मादाय रुग्णालये आणि विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून मिळणारी मदत थेट आणि वेळेत रुग्णांच्या नातेवाईकांपर्यंत पोहोचवणे शक्य होणार आहे. धर्मादाय आयुक्तांच्या नियंत्रणाखाली असलेल्या रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांवर मोफत आणि सवलतीच्या दरात उपचार केले जातात. या प्रक्रियेत अधिक सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाची यंत्रणा जोडली जाणार आहे. रुग्णालयांच्या परिसरात नातेवाईकांसाठी निवारा, अल्पदरात, मोफत भोजन आणि वैद्यकीय मार्गदर्शनाची सोय अधिक प्रभावीपणे केली जाईल. सर्वसामान्यांना आरोग्य सेवा मिळवताना येणाऱ्या अडचणी दूर करणे आणि त्यांना प्रशासकीय प्रक्रियेत सुलभता मिळवून देणे हा या उपक्रमामागचा मुख्य उद्देश आहे. यामुळे राज्यातील हजारो गरीब आणि गरजू रुग्णांना व त्यांच्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या करारामुळे धर्मादाय संस्थांचे योगदान आणि शासकीय यंत्रणांची कार्यक्षमता एकत्र येऊन एक आदर्श आरोग्य सहाय्य मॉडेल राज्यात उभे राहील.

अशा धर्मादाय न्यासांच्या सहकार्याने विविध "त्रिपक्षीय सामंजस्य करार " करण्यात येऊन त्याचा थेट लाभ रुग्णांना देणे शक्य होणार आहे. त्यासाठी सीएमआरएफच्या वेबसाईटवर सर्व तपशील उपलब्ध आहे. त्यात सर्व संस्थानी सहभाग नोंदवावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे




महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २३ ऑगस्ट २०२६

# काळ पूर्वीचा, आणि आजची स्थिती एक समीक्षा

**पू**र्वीच्या आपल्या माणसास गावागोवूत्र्यास जाण्यासाठी दळणवळण साधने,आणि अंगावर अंगभर धड कपडे नसायचे, गळाठ ठीगळ पँट करदुड्यात आणि वरून आटा मारीत तुरहाटीची काडी पिरगळावयाची , प्रवासासाठी गाडीबैल काहीच्याच नशिबात. रिसोड, डोंणगाव,मेहकर. हिंगोली या बाजाराला जायचं की वाड वडीलासोबत पायी धूम ठोकित पुढे पळायचे आणि पुढे जाऊन सावलीत रस्त्यातील झाडाखाली दम खायचा.पुढे येणाऱ्या वाहणाऱ्या नदीपात्रात असला तर बाभूळ काटे लावून पळसाचा डोना पाणी पिण्यासाठी करायचा ..,किंवा पावसाळ्यात वाहणारे पाट पाणी, शेतातील वघळीत थांबलेले पाणी ओंजोळीने प्राशन करायचे.तहान भागवायची ,काय मस्त अरोच्या पाण्यापेक्षा गोड नारळ पाण्यासारखे असे चवदार नितळ. उन्हाचे चटके पायाला कधी चींदकाने ,तर कधी पळसाची पाने बांधण्याचे तात्पुरते निकामी भौतिक सुखप्रयोग करायचे.पण व्यर्थ ..बांधण्यास सुतळी फार दुर्मिळ.शेतीत पिकासाठी पेंढ्या बांधण्यास ,झोपड्यांना वाक चऱ्हाट ,किंवा वेल, केकटीचे पान लांब पट्टा शीलून उपयोग करावा लागत होता. पूर्वीच्या काळी श्रीमंती बोटावर मोजण्याइतकी आपली माणसं, जमिनजुमला ,मालमत्ता बाळगण्याचा अधिकार नव्हता.बाकी सगळे कष्टकरी, मध्यमवर्गीय किंवा गरीब माणसे होती.आपणास पाटील मराठा लोक गाडीच्या आसपास नाही तर धुरकरी सुद्धा म्हणून घेत नसत.झाडावरचे आंबे उतरविण्यास त्यांना त्यांच्या जातीचे उतारे लागत.कारण पाड खाताना अस्पृश्यांचे उष्टे हात आंब्यास लागतात.हा एक जातीय द्वेषभ्रम.आमच्या गावात एकदा एका मऱ्हाटा माणसांनी एका कृष्णा मातंगास धूरकरी म्हणून रीसोडला नेले म्हणून त्यांच्या कुणबी मऱ्हाटा जातपंच्यायतीने त्याला खूप मोठी शिक्षा केली होती. माणगाव परिषद संपल्यावर छत्रपती शाहू राजे आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांना एक मऱ्हाटा पाटलाने जेवण करण्यास त्यांच्या घरी बोलावून आदरतिथ्य केलं म्हणून जातीच्या लोकांनी वाळीत टाकलं,परिणाम त्याकाळी त्या दीडशे एकर शेती असलेल्या आणि गावात प्रशस्त घर असलेल्या माणसाला जातपंचायतीच्या लोकांनी गावात राहू दिले नाही.हे सर्व वैभव सोडावे लागले.ही नोंद आहे.असेच आमच्या गावचे हे प्रकरण माझ्या वडिलांनी मला सांगितले होते .ते आजही मला आठवते.जातपंचायतीच्या प्रारूप हे शिक्षेचे स्वरूप म्हणजे काही दिवस शिरापुरी जेवणावळ ,आणि नाक घासनीचा प्रकार अमानवीय होता. त्याकाळी आमच्यासाठी छकडे, डमनीत बसण्याचा आनंद खूप लय लय लय मोठा,कारण आमच्याकडे एक खटारा गाडी त्यातही बाहेरगावी न्यावयाची तर मोठी बला कारण चाके घिसड्याकडून धाव पाणी पाजणे ,ही आर टी ओ सारखी धूर तपासणी प्रमानपत्रा सारखी पंजिकृत ठप्पा.आणि सुतरा कडून गाडीची आरे पाहणी आणि डागडुजी करावी लागत होती. आज हे सुख ए .सी कार मध्ये नाही.ती मजा ग्रामीण भागात गतिमान बैलचलीत गाडी मानवी बनावट सयंत्रतात होती. पूर्वी आईवडील हमखास मुलांना लग्नकार्यात , नातेवाईकांच्या सुख दुःखात सोबत घेऊन जात.कुठलाच पायपीट करीत चालावे,लगबग लगबग पळावे हाच एकमेव पर्याय होता .लाड नव्हते.बस दर्शन दुर्मिळ प्रवास तर माहीतच नव्हता..मी नव्वीत गेलो पुसदकडे शिक्षणास गेलो म्हणून बस प्रवासाचा एक नशीब योगच. आज सर्व सोयसुविधा असून देखील सुखदुःखात नवपीढी दिसत नाही.ही खूप मोठी शोकांतिका आहे.बऱ्याच कार्यक्रमात म्हाताऱ्या आया आणि जेष्ठ नागरिक भरणा असतो. नवयुवकाची गर्दी असते ती डी जे मध्ये नचाण्यासाठी. तेथेच समाज चुकतो.मुले ऐकत नाहीत हा वायफळ बोभाटा चुकीचा आहे.आपण कुंभार भूमिका पार पाडतनाही.आज बुद्धविहारातसुद्धा नवतरूनायीची आज उणीव भासते.बऱ्याच मुलास पंचशील येत नाही. मग धम्मसंस्कार शब्द फोल ठरतात..आज ट्युशन संस्कृतीने मानवी जीवनाचा अर्थच गमावला.आम्ही शाळा करून संध्याकाळी चुलीजवळ इंधन पुरवठा करणे आणि पूर्वतयारी करत होतो.शेतातून येणाऱ्या आईस भाकरी करणे सोयीचे व्हावे,आणि चूल धुपारू नाही म्हणून सकाळची जमा झालेली राखेची विल्हेवाट उकिरड्यावर करावी लागत होती रात्री प्रकाश यंत्रणेसाठी कंदील काच राखेने स्वच्छ पुसूनपासून ठेवावा लागत होता ,आत असलेल्या दिवालगिरीचे पोट रॉकेलने भरायचे ,एकही थेंब न सांडवता, भरावी लागत होते.ही काळजी. गाई बकऱ्या घरी आल्या की, सोडबांध असायची, मारक्या गाईस चोपकारत लाडिगोडिने चारा दाखवत भितभित बिल्ड मारावे आणि भीतीने पळावे.बकऱ्या बांधायच्या ,डाल्याखालचे बकरीचे पिले सोडून एकमेकांचा वाटा समप्रमाणात पितात की नाही हे पण लक्ष ठेवण्याचे जुजबी काम.हे शाळे व्यातिरिक वेळापत्रकिय काम... त्याकाळी शिक्षणासाठी पैसा तर दूरच, दोन , तीन,नंतर पाच पैशात पेनात शाई भरण्याचे वांदे.रडून, कीलजण्या ,म्हस्का ,लाडात येत सांगावे लागे,कालच राजनातील पाणी टाकून पेनान लीहवल,आज ख ल्डून शाई संपली तर प्रसंगी देखावा,पेनाचे अटे खोलून उबडा करून दाखविले तेंव्हा वडील बंडीच्या खिशातून मोठ्या मुश्किलीने पैसे काढीत ,आणि मग आंनदात सुलतान भाईच्या दुकांना पर्यंत थेट दुकानाकडे धूम .त्यातील उर्वरित पैसे न चुकता परत , फेफरमीट गोळी घेवयाची तर बिगर परवानगीची नाही.त्यावेळींदोन वेळच्या भाकरीस चव असायची मस्त हिरव्या मिरच्यांचा ठेचा तोही शेतीच्या व्यस्त कामातून वेळ काढून ,आईने ओबडधोबड खलबत्त्यात किंवा पाट्यावर रगडलेला आणि खलबतकूट्टा...नाहीतर मडक्यातील खाराची फीड,नाहीतर चिकट गुळाचा मोजकाच खडा.ती शाळा शिदोरी धोतराच्या फडक्यात बांधलेले स्वाद टिफीन जेवन नंबर वन ...बर्गर ,पिझ्झा, नुडल्स ह्या गोष्टी आज मनाला झोंबतात.पूर्वीच्या आईवडिलांनी पोटाला चिमटा काढून लेकरांना शिकवलं.आज आपण सुखात जगतोय, ते त्यांच्या घामाच्या थेंबांवर उभं आहे, म्हणून त्यांच्या कष्टांची किंमत पैशात नाही, तर कृतज्ञतेत मोजा!एव्हढीच नवपीढ ,तरुणाई कडून अपेक्षा.

✍ **मधुबानंदा प्रधान,**
**अकोला**

